**संक्षीप्त फौ.ख.क्र.३५/२०२३**
**शासन विरुध्द सागर**
**नि.क्र.१८ पुढे सुरु**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.१**

मी देवाची शपथ खरे सांगतो की,
माझे नाव - कमलाकर गणपत कदम,
वय – ४१ वर्षे, कामधंदा - शेती व मजुरी,
राहणार - दहयाट, वाई जि.सातारा.

**सरतपासणी सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती सुळ -**

दि. २३/११/२०२२ रोजी वाई पोलीसांनी मला कुठेही बोलावले नव्हते. माझ्यासमक्षकोणतीही पंचनामा कार्यवाही झाली नव्हती. आता मला घटनास्थळी जप्ती पंचनामा दाखवण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहीती नाही.

सदर साक्षीदार सरकारपक्षाच्या कथनास समर्थन करीत नसल्याने सहायक सरकारी अभियोक्ता यांनी त्यास उलटतपासाच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली**.** परवानगी देण्यात आली**.**

२.	हे म्हणणे खरे नाही की, दि.२३/११/२०२२ रोजी वाई पोलीस ठाण्याचे कर्मचारी श्री वरखडे यांनी मला वाई गावच्या हद्दीतील बस स्टॉपजवळ बोलावुन घेतले व त्यावेळी त्यांनी मला अशी माहीती दिली की आरोपी सागर हा बलकवडी वायगाव व इतर शेजारी गावात मोटार सायकलवरुन अवैद्यरित्या दारु दारुची वाहतुक विक्री करत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या अनुषंगाने छापा कार्यवाहीकामी मी पंच म्हणुन हजर राहण्यासाठी मौजे वायगाव येथे गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी माझ्यासोबत दुसरे पंच महादेव रामचंद्र वाडकर होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी ऊळुंब ते बलकवडी जाणारे रोडवर पायी चालत जावुन त्या ठिकाणी आम्ही थांबलो. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी सदर ठिकाणाहुन मोटारसायकल क्रमांक एम एच ११ बी एम २२३६ हिने आरोपी येताना आम्हाला दिसला व पोलीसांनी त्यास थांबवुन त्यास त्याचे नाव व पत्ता विचारले. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी त्याच्या अंगझडतीतुन

पोलीसांना एका पांढ-या रंगाच्या बंडीमधुन देशी विदेशी दारुच्या बाटल्या मिळुन आल्या होत्या हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी त्याच्या ताब्यातुन प्रत्येकी ९० मिलीच्या एकुण ९२ देशी दारु संत्राच्या प्लॅस्टीकच्या बाटल्या तसेच ब्लॅक डिलक्स विस्की असे लेबल असलेल्या प्रत्येकी १८० मिलीच्या २ काचेच्या बाटल्या, व्हीओ कंपनीचा ॲन्ड्राईड मोबाईल असा ऐवज मिळुन आल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, त्यापैकी प्रत्येकी २ बाटल्या रासायनिक परिक्षणाकरिता वेगळया काढुन आमच्या सहीनिशी सिलबंद करण्यात आल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी पोलीसांनी आरोपीकडील स्प्लेंडर मोटारसायकल जप्त केली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी त्याप्रमाणे घटनास्थळ जप्ती पंचनाम्याची कार्यवाही केली होती व त्यातील मजकुर आम्हा पंचांना वाचुन दाखवला होता व तो बरोबर असल्याने आम्ही त्यावर पंच म्हणुन सहया केल्या होत्या. मी आरोपीस ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीस ओळखतो व त्यास वाचविण्यासाठी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

सरतपास पुर्ण

**उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री.एस. पी. गाढवे-**

**उलटतपास नाकारला.**

**फेरतपास नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत,

RAVINDRA MADHUKARRAO BHENDE

Digitally signed by RAVINDRA MADHUKARRAO BHENDE
Date: 2025.11.07 13:38:34 +0530

दि.०७.११.२०२५

(आर.एम. भेंडे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, वाई.